advt17


# महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद,

(महाराष्ट्र कृषी विद्यापीठ अधिनियम, १९८३ मधील कलम १२ नुसार स्थापित)

१३२/ब, भांबुर्डा, भोसलेनगर, पुणे - ४११ ००७.

MCAER कृषि परिषद

ई-मेल : edu_mcaer@rediffmail.com संकेतस्थळ : www.mcaer.org दूरध्वनी (०२०) २५५२८६८८


जा.क्र. मकृप/शिक्षण-१/२२२/ ८९६ दि.१० जानेवारी,२०२२

प्रति,

अधिष्ठाता (कृषी) / कुलसचिव
महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी
डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला
वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी
डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषी विद्यापीठ, दापोली

विषय:- **सन २०२१-२२ या शैक्षणिक वर्षातील आचार्य पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेबाबत.**

राज्यातील सर्व कृषी विद्यापीठांतर्गत सन २०२१-२२ या शैक्षणिक वर्षातील आचार्य पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशाचा कार्यक्रम महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषदेमार्फत दि.१७/०१/२०२२ पासून राबविण्यात येणार आहे. यासंदर्भात प्रवेश सूचना सोबत जोडली आहे.

याबाबत आपणास कळविण्यात येते की, आपल्या कृषी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील प्रवेशोच्छुक व पात्र उमेदवारांना याबाबत अवगत होण्याच्या दृष्टिकोनातून सोबत जोडलेली प्रवेश सूचना कृषी विद्यापीठांच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून द्यावी. तसेच कृषी विद्यापीठाच्या सूचना फलकांवरही प्रसिध्द करण्यात यावी.

सोबत- प्रवेश सूचना.

(विश्वजीत व. माने)
महासंचालक

प्रत:-

१) मे.एसएमबी सिस्टमस् प्रा.लि. विश्वकुटीर, शंकर घानेकर मार्ग, दादर (पश्चिम), मुंबई ४०००२८

यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी सोबत जोडलेली प्रवेश सूचना आपल्या संकेतस्थळावर उपलब्ध करून द्यावी. तसेच चालू शैक्षणिक वर्षामध्ये महाराष्ट्र कृषी विद्यापीठे परीक्षा मंडळाची आचार्य पदवी सामायिक प्रवेश परीक्षा दिलेल्या उमेदवारांना भ्रमणध्वनी संदेशाद्वारे प्रवेश सूचनेबाबत अवगत करावे.

२) मे. मिट्र स्किलोजिस्, दुसरा मजला, रत्नतारा कॉम्प्लेक्स, क्रांती चौक, नवी सांगवी, पुणे ४११०४७

यांना सूचित करण्यात येते की, सोबत जोडलेल्या आचार्य पदवी प्रवेश सूचनेस कृषी परिषदेच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून द्यावे.


विद्या ११/१
Dy. Reg. | A. Reg. | B&O.S. | Inward No. | Date
11 JAN 2022
REGISTRAR'S OFFICE 18

advt17


# महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद,

MCAER
कृषि परिषद

(महाराष्ट्र कृषी विद्यापीठ अधिनियम, १९८३ मधील कलम १२ नुसार स्थापित)
१३२/ब, भांबुर्डा, भोसलेनगर, पुणे - ४११ ००७.

ई-मेल : edn_mcaer@rediffmail.com संकेतस्थळ : www.mcaer.org दूरध्वनी (०२०) २५५२८६८८


जा.क्र. मकृप/शिक्षण-१/२२२/८७

दि.१० जानेवारी,२०२२

## कृषी विद्यापीठांतर्गत आचार्य पदवी प्रवेश सूचना २०२१-२२

महाराष्ट्र राज्यातील महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी व डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषी विद्यापीठ, दापोली या चारही कृषी विद्यापीठांतर्गत सन २०२१-२२ या शैक्षणिक वर्षाकरिता खाली नमूद केलेल्या आचार्य पदवी अभ्यासक्रमास प्रवेशासाठी इच्छुक उमेदवारांकडून प्रवेश माहिती पुस्तिका २०२१-२२ मधील सूचनेनुसार ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहेत. प्रवेश प्रक्रिया महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषदेमार्फत केंद्रीय पध्दतीने राबविण्यात येत आहे. अभ्यासक्रमाचे माध्यम इंग्रजी राहील.

१. उपलब्ध विद्याशाखा

| अ.क्र. | अभ्यासक्रम | अ.क्र. | अभ्यासक्रम |
|---|---|---|---|
| (१) | पीएच.डी. (कृषी) | (२) | पीएच.डी. (मत्स्यविज्ञान) |
| (३) | पीएच.डी. (कृषी जैव तंत्रज्ञान) | (४) | पीएच.डी. (कृषी अभियांत्रिकी) |
| (५) | पीएच.डी. (अन्न तंत्रज्ञान) | | |

२. प्रवेश पात्रता, महाविद्यालय, प्रवेश क्षमता, आरक्षण, प्रवेश कार्यपध्दती इत्यादी सविस्तर तपशिलाचा अंतर्भाव असलेली शैक्षणिक वर्ष २०२१-२२ ची आचार्य पदवी प्रवेश माहिती पुस्तिका व ऑनलाईन प्रवेश अर्ज दाखल करण्याची सुविधा दि. **१७ जानेवारी,२०२२** पासून **www.mcaer.org** व **https://maha.agriadmissions.in** या संकेतस्थळांवर उपलब्ध असेल. प्रवेशोच्छुकांनी सदर संकेतस्थळावरून प्रवेश माहिती पुस्तिका प्राप्त करून घ्यावी. प्रवेश अर्ज दाखल करण्यासाठी अवलंबवावयाची कार्यपध्दती पुढीलप्रमाणे आहे.

advt17

**प्रवेश अर्ज दाखल करण्यासाठी अवलंबवायची कार्यपध्दती-**

- उमेदवारांने **maha-agriadmission.in** या संकेतस्थळाद्वारे दि. २५ जानेवारी,२०२२ पर्यंत ऑनलाईन प्रवेश अर्ज भरावा. यानंतर प्रवेश अर्ज भरण्याची सुविधा संकेतस्थळावर उपलब्ध नसेल.
- 'ऑन लाईन' भरतांना उमेदवाराचे पासपोर्ट आकाराचे सध्याचे छायाचित्र, उमेदवाराची स्वाक्षरी, आवश्यक ती संबंधित स्वयंसाक्षांकित कागदपत्रे स्कॅन करून संकेतस्थळावर अपलोड करावीत.
- **प्रवेश अर्ज किंवा कागदपत्रे हातबटवडयाने / टपालाने / कुरीअरने पाठवू नयेत.**
- प्रवेश अर्ज भरतेवेळी प्रवेश अर्जाचे शुल्क डेबिट कार्ड, क्रेडीट कार्ड किंवा नेट बँकीगद्वारे भरावे.

**प्रवेश अर्ज दाखल करण्यासाठी भरावयाचे शुल्क-**

खुल्या प्रवर्गासाठी रु. २०००/-

आरक्षित प्रवर्गासाठी रु. १०००/- (अ.जा., अ.ज., वि.जा*, भ.ज*, इ.मा.व*, वि.मा.व*, आ.दु.घ.)

[*उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र अनिवार्य.]

पात्र असलेल्या प्रवेशोच्छुक उमेदवारांना आवाहन करण्यात येते की, त्यांनी उक्त संकेतस्थळावरील माहिती पुस्तिकेचे आकलन करून विहित वेळेत ऑनलाईन प्रवेश अर्ज दाखल करावेत.

क्र. मकृप/शिक्षण-१/२२२/ ८७
दिनांक- १० जानेवारी,२०२२

(विश्वजीत व. माने)
महासंचालक
महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे

advt17

**MAHARASHTRA COUNCIL OF AGRICULTURAL EDUCATION & RESEARCH,**
**132-B, Bhamburda, Bhosalenagar, Pune – 411 007.**

# ADMISSION TO DOCTOR OF PHILOSOPHY (Ph.D.) PROGRAMME IN FOUR AGRICULTURAL UNIVERSITIES 2021-22

(Detail information is available on **www.mcaer.org** or **maha-agriadmission.in**)

Applications in the prescribed form, duly filled in as per the instructions contained in the Prospectus for the year 2021-22 are hereby invited for the admissions to the below mentioned Ph. D. courses in Mahatma Phule Krishi Vidyapeeth, Rahuri, Dr. Panjabrao Deshmukh Krishi Vidyapeeth, Akola, Vasantrao Naik Marathwada Krishi Vidyapeeth, Parbhani and Dr. Balasaheb Sawant Konkan Krishi Vidyapeeth, Dapoli in the Maharashtra State. The medium of instructions is English for all courses.

1. **FACULTIES AVAILABLE**

| Sr. No. | Course | Sr. No. | Course |
|---|---|---|---|
| (1) | Ph.D. (Agriculture) | (2) | Ph.D. (Fisheries) |
| (3) | Ph.D. (Agricultural Bio-Technology) | (4) | Ph.D. (Agricultural Engineering) |
| (5) | Ph.D. (Food Technology) | | |

**For more details regarding Eligibility, Colleges, intake capacity, reservation of seats, etc., please refer to the PROSPECTUS FOR THE ACADEMIC YEAR 2021-22 which is available on 'https://maha.agriadmissions.in'**

2. Application forms and prospectus shall be made available **w.e.f. 17th January,2022 on https://maha.agriadmissions.in**
3. The eligible candidates seeking admissions for any of the above courses for the year 2021-22 may obtain the prospectus. Submit Online application form at **https://maha.agriadmissions.in** upto 25th January,2022. Facility of submtting application form will not be availabe after said date.
4. Candidates have to upload their passport size latest photograph, candidate signature and self attested copies of relevant documents on website.
5. Application form or documents should not be sent by hand / post / courier.
6. The admission fee should be paid by debit card, credit card or net banking while filling application form.

**Fees for submission of application form :**

For Open category Rs. 2000/-
For Reserved category Rs. 1000/- (SC, ST, VJ (a)*, NT(b)*, NT(c)*, NT(d)*, OBC*, SBC*, EWS)
[* Requires Non Creamylayer Certificate]

Eligible candidates are requested to submit the Online Application form in prescribe time by reviewing the Prospectus on the said web site.

No. MAC/edn-1/222/ 87
PUNE.
Date- 10 January,2022

**Director General**
**Maharashtra Council of Agriculture Education & Research,**
**Pune-411 007.**